*गुलाब-वाटिका - १३*

## श्रीगुलाबरावमहाराज : प्रश्नोत्तरी -- ३

# धर्म विचार





**(नीती-धर्म-वारकरी-जगाचा धर्म-धर्मस्थापक- आर्य भारतातीलच)**

श्रीगुलाबराव महाराज जीवनशताब्दी प्रकाशन
२०-९-२०१५

रु.१०

*__संपर्क__ : नारायण मोहोड ०९८२२४४०९५१*
*श्रीगुलाबरावमहाराज-ट्रस्ट,आळंदी-देवाची,जि.पुणे.*







*श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार*

### श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला-

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!





### श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य
(इ.स.१८८१ ते १९१५)

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.


संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.





भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतां हाती दिले. ०००



**युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे.**

**संपर्क : श्रीरंग घटाटे.** बोलेपेट्रोलपंप,अमरावतीरोड,
सिव्हिल लाइन नागपूर ४४०००१.
टे-९३७२५२९७७० / ०७१२-२५३३९९७

*गुलाब वाटिका १३*

श्रीगुलाबरावमहाराज : प्रश्नोत्तरी -- ३

# धर्म विचार

**(नीती-धर्म-वारकरी-जगाचा धर्म-धर्मस्थापक- आर्य भारतच)**

**दान**

**१ थोरपणा कशास म्हणतात?**

सदर्थ उचित स्वार्थत्याग हाच थोरपणा होय. दुर्जनासाठी स्वार्थत्याग करणे काही थोरपणा नव्हे. ...अनुचित स्वार्थत्याग झाल्यास त्याची गणना वेडेपणातच होते. ५०८

**२ दाता कोण ?**

अभय देणारा! ५०९

**३ सर्व दानात श्रेष्ठ दान कोणते ?**

अभयदान व अन्नदान! ५१०

**४ या दोहोत कोणते श्रेष्ठ ?**

अज्ञात याचकाविषयी अन्नदान व ज्ञात





याचकाविषयी सर्वदा अभयदानच श्रेष्ठ आहे. कारण ही दोन्ही दाने प्राणदानाच्या तोडीचीच आहेत. शिवाय ती कोणालाही देता येतात. अभयदान हे अन्नदानापेक्षा सुलभ आहे, परंतु त्यात मनोविकारांचे दमन फार मोठे लागते. म्हणून ते सर्वात श्रेष्ठ आहे. शिवाय इतर दानाने जसा अभिमान येतो, तसा अभयदानाने येत नाही व अभयदानाचा अभिमान असल्यास उलटा तो नरकनिवर्तकच होतो. ५११

**५ दान कशाकरिता करावे ?**

आपले काहीच नाही अशी बुद्धी दृढ होण्याकरिता! ५१२

**६ याचक फसविणारे पुष्कळ आहेत; मग दान द्यावे की नाही?**

आपणही पुष्कळांना फसविले आहे व फसवित आहो व पश्वादिकांनाही फसवितच असतो, असे समजून यथाशक्ती दान करावे.

**७ कोणता उपकार कशाने फिटतो?**





१- पैशाचा उपकार दुप्पट दिल्याने फिटतो.
२- अन्नाचा उपकार देह दिल्याने फिटतो.
३- पितरांचा उपकार गयावर्जनादिकाने फिटतो.
४- गुरूचा उपकार त्यांनी आज्ञा दिल्यावर, संप्रदाय वाढविल्याने फिटतो. असे सूज्ञांचे मत आहे. पण असे करून देखील उपकारांची स्मृती जागृत ठेविली पाहिजे. नाहीतर तो उसने फेडणारा कृतघ्न समजला जातो. ५१४

**८ अहो, अन्न देणाऱ्याचा उपकार देह दिल्याने जर फिटतो तर भिकाऱ्यांनी व महात्म्यांनी कसे करावे?**

भिकारी आपन्न असतात, म्हणून त्यांना परान्नाचा दोष नाही आणि महात्मे परमेश्वरस्वरूप असल्यामुळे त्यांचेच सर्व आहे, म्हणून त्यांना परान्नाचा दोष नाही असे शास्त्र आहे. ५१५

**९ ठक कोण?**

दुसऱ्यास दान देण्यास सांगतो व आपणावर प्रसंग आला असता दान देण्याचे टाळतो तो! श्रीतुकाराम सुचवितात- वाघे उपदेशिला कोल्हा । सुखे खाऊ दे रे





मला ।।१।। देह जाणार जाणार । परी घडो परोपकार ।।२।। सिंह म्हणे भला भला । तुझ्याच तोंडे निवाडा झाला ।।३।। गांठ पडली ठका ठका । त्याचे वर्म बोले तुका ।।५१६

**१० पृथ्वीतील धन वस्तुतः कोणाचे आहे?**

धार्मिकाचे ! त्याने धर्माकरिता त्याचा कसाही विनियोग करावा. ५१७

**११ पैसा जर आम्ही कमावतो तर दान कां करावे?**

मूर्ख व नीच लोकांचा हा व्यर्थ अभिमान आहे. सर्व लोक दानावरच पोट भरत असतात; कोणालाही स्वतंत्र पैसा मिळत नाही. निरपराधी पशूच्या प्राणावरच मनुष्यांचे सर्व चालते. - तेव्हा परस्पराला देणे हा काही मोठा उदारपणा नव्हे म्हणून दान करणे हा मनुष्याचा स्वभावच असला पाहिजे. सृष्टीत परस्पर उपकारकरता आहे, म्हणून खरा उपकार करणारा एक परमात्माच आहे....

दारिद्र्य व श्रीमंती दैवानुसार सर्वांना आहे, इकडे लक्ष देऊन 'श्रद्धेने थोडक्यात थोडके कोणास काही द्यावे.'

सर्वांनी आमचे नोकर झाले पाहिजे म्हणून कोणास भिक्षा देऊ नये, हे पैशाने फुगलेल्यांचे नीच म्हणणे कोणीकडे! आणि सर्वांच्यावरच मी पोट भरले आहे, म्हणून माझ्या मिळकतीचे ते विभागी आहेत, ही जगन्मान्य उदार समजूत कोणीकडे!

दानरहित भोग करणाऱ्यांची संपत्ती स्तेनांची(चोरांची) झाल्यास त्यांना पाप कशाचे! ५२०

**१२ स्वत्व कशाला म्हणतात ?**

अमुक माझे आहे, असा अभिमान धरण्याला कोणाकडून हरकत येण्याला! ५२३

**१३ चोरापुढे पळून जाणाऱ्याला दानाचे फळ मिळते की नाही?**

नाही. दान म्हणजे खुशीने देणे होय. ५२५

**१४ दान श्रेष्ठ की सत्य श्रेष्ठ ?**

माझ्या मताने ते दोन्ही एक आहेत.जितके सत्यात त्यागाचे धैर्य दाखवावे लागते तितके दानातही त्यागाचे धैर्य दाखवावे लागते. -- पण सत्य कोणी विचारल्यास बोलावे लागते आणि **‘दान न मागताही देणे’** सांगितले आहे. हा सत्यापेक्षा दानात विशेष आहे. -- परंतु देईन





म्हटल्यावर न देणे किंवा भलतेच देणे दात्याला धर्मसाधक होत नाही.म्हणून दानाला सत्याची अपेक्षा आहे.याप्रमाणे ते दोन्ही एकच होत असे माझे मत आहे. ५२६

**१५ ‘दया दानाद् विशिष्यते’ असे कां म्हणतात?**

दयेने केलेल्या दानात कोणतीही कामना नसते. म्हणून लोकव्यवहारही असा आहे की जे जे दयेने दिले जाते त्याचा बदला कोणी इच्छित नाही. ५२७

**१६ जो तो आपल्या कर्माचे फळ भोगतो मग त्याला मदत कां करावी?**

तूं आपल्या कर्माचे फळ भोगत असलास म्हणजे दुसऱ्यांनी आपल्यास मदत करावी असे तुला वाटत असते म्हणून! ‘‘मी आपल्या कर्मांचे फळ भोगतो. मला साह्य कशाला करता?’’ असे तूं कधी म्हणतोस काय? शिवाय जीव कर्माचे फळ भोगतो असे शास्त्रच सांगते व दुसऱ्यास मदत करावी असेही शास्त्रच सांगते. **‘श्रद्धया देयम्’** इत्यादी श्रुती शिक्षेतच आहेत....उघडपणे दोष दिसला नाही तोपर्यंत यथाशक्ती कोणासही द्यावे.
शिवाय दुसऱ्याचे दोष पाहून नंतर देऊ असाच जर आग्रह





असेल तर आपल्यात कोणताच दोष नाही, अशीही आपली खातरी असली पाहिजे. कारण ‘‘दुष्टाला दान देऊ नये’’ जसे शास्त्रात सांगितले आहे, तसा ‘‘दुष्टाचा प्रतिग्रह घेऊ नये’’ असेही शास्त्रात सांगितले आहे. बरे, सर्वच शिथिल असेल तर यथाशक्ती धर्म करावा हेच निघते. ५२८

**१७ दात्यात व याचकात सद्गुण व दुर्गुण कोणते समजले गेले आहेत?**

जवळ असल्यास, कोणालाही नाही न म्हणता, ‘साक्षात् किंवा परंपरेने यथाशक्ती देणे’ हा दात्याचा मुख्य गुण होय; आणि मिळेल तेवढ्यात संतुष्ट राहणे, हा याचकाचा मुख्य गुण होय. ५३०

**१८ तुम्हां आम्हांस विष्णुतीर्थाने ज्ञान कां होत नाही?**

घेणारा अती तप्त व श्रद्धालू नसतो व देणारा अधिकारी नसतो म्हणून! ५३४

**१९ नामदेव कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन**



**‘शास्त्र जे सांगेल ते चांगले व नाही सांगणार ते वाईट’**



**धावले तेव्हा त्यापासून त्यांना पुण्य कसे झाले?**

जो सर्व भूती परमेश्वराची उपासना करतो, त्याला तपक्षयादिकांचे नियम लागू नाहीत. नामदेव गाईच्याही मागे तसेच धावले असते.गाय सनाथ म्हणून सोडून कुत्रे अनाथ म्हणून पालन करण्यामागे नामदेव लागले नव्हते.

‘माझ्या भावाला जिवंत करण्याचे सामर्थ्य माझ्या हाती नाही.व मी काही त्यांना टाकून दिले नाही; परंतु हे कुत्रे जीव ठेवून माझ्याबरोबर आले आहे.म्हणून याला सोडून मरणेहि मला उचित नाही’- हे युधिष्ठिराचे स्वर्गारोहण पर्वातील उद्गार भूतसाम्यप्रेमाचेच द्योतक आहेत. ...५३५

## कुलधर्म

**२० कुलधर्म चांगले कोणते व वाईट कोणते ?**

शास्त्रीय व सांप्रदायिक चांगले आणि नवसाने लावून घेतलेले सर्व वाईट! ५३६

**२१ मग नवसाने लागलेले कुलधर्म पाळावे की नाही?**

धर्मात बाध येत नसेल आणि सत्कार्या करता असतील तर पाळावेत व त्याच्या उलट असतील तर खुशाल टाकून द्यावेत; काही होत नाही. ५३७

## वारकरी पंथ

**२२ आपण कोणत्या पंथाचे आहा असे लोकांना समजत नाही?**

१-नाही तर, मी सांगतो.मी कोणत्याही पंथाचा अभिमानी नाही तथापि शहाणा असा वारकरी पंथ मला मान्य आहे. इतका सुंदर पंथ मागे झाला नाही व पुढे होणार नाही. हा पंथ इतक्या शहाणपणाने स्थापिला गेला आहे की, त्याला पंथ न म्हणता धर्मच नांव शोभते.

२- आक्षेपार्ह अशी गुरुशिष्यपद्धति या पंथात नाही, तर ती शुद्ध आहे.

३- निरनिराळ्या देवतेंचे उपासक या पंथात होऊन गेले आहेत. नरहरीसोनार महाशैव, जनार्दन- एकनाथ दत्तभक्त, भानुदास सूर्योपासक, तात, तुकारामादि वैष्णव, हे सर्व या पंथाचे अध्वर्यु झाले आहेत. शिवाय नाथादि ब्राह्मण, तुकारामादि कुणबी, शेखमहम्मदादि





मुसलमान, रोहिदासादि चांभार, चोखामेळादि महार आणि कान्हुपात्रादि वेश्या सुद्धा या पंथाच्या अनुयायी झाल्या आहेत. मुक्ताबाई सारख्या ब्रह्मचारिणी आचार्या व जनाबाई सारख्या दासी या पंथात समत्वाला आलेल्या आहेत.नामदेवांची लालनभक्ती विश्वंभरादिकांचे वात्सल्य, आणि मुक्तकेशी आदि बायांचे माधुर्य या पंथात एकवटलेले आहे.

४- जितके म्हणून हिंदुस्थानात सत्पुरुष होऊन गेले त्या सर्वांचा एकवेळ या पंढरीशी परिचय झाला आहे.

५- द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत सर्व काही या पंथात संपादिले आहे.

६- शिवाय कबीर, नानक पंथाप्रमाणे कर्म सोडवावयाला लावून हा पंथ कोणाची मने दुखविणारा नव्हे, त्यामुळे

## हा पंथ खास विश्वधर्म होणार !

७- आता या पंथात कांही लोक आग्रही आहेत, मी नाही म्हणत नाही; तथापि इतर पंथाच्या आचार्यांतहि आग्रह वरवर पाहणारास दिसत होता. तो या पंथाच्या स्थापकांत दिसत नाही.





८- पुनः या पंथाने एखादी गादी स्थापन करून पैसे उपटण्याची व्यवस्था केली नसल्यामुळे व वैदिक चिन्हांचा त्याग न करता पौराणिक चिन्हांनीच हा पंथ अलंकृत असल्यामुळे, मी विठ्ठलउपासक जरी आपल्याला म्हणवून घेत नाही, तरी पण कायावाचामनेकरून या पंथाच्या ठिकाणी माझा अत्यंत आदर आहे.

**''धर्मभेदांचा नाश करून सद्गती देणारा हाच एक पंथ होईल,''** असे मी म्हणतो. ५३८

## हिंदु धर्म

**२३ हिंदू कोणास म्हणावे ?**५४०

१- वेद, वेदांग, पुराणे व तदनुकूल संप्रदाय हे ज्यास मान्य आहेत व जो परंपरागत हिंदूच्याच पोटी आला आहे त्यास !

२- परंतु हे ज्यास मनापासून प्रमाणच वाटतात त्यालाही **दीक्षाहिंदू** म्हणजे **दीक्षार्य** म्हणावे.

३- ज्याला हे मान्य नाहीत व केवळ हिंदूच्या पोटी आला आहे तो **जन्मार्य** म्हणजे **जन्महिंदू** होय.

४- **उभयार्य** सर्वथा श्रेष्ठ आहेत;





५- पण उभयार्य नसेल तर पूज्यतेच्या दृष्टीने दीक्षार्यच मी श्रेष्ठ मानतो;

६- तथापि लग्नाच्या कामात जन्मार्याचीच योजना करावी.

**२४ आर्यधर्मात कोणते ग्रंथ नेहमी वाचण्या सारखे आहेत व त्यात काय सांगितले आहे?**

रामायण, भारत व भागवत हे आर्य धर्माचे तीन मुख्य ग्रंथ असून-

१. **राम = परमात्मा,** त्याचे अयन = स्थान, सर्वत्र राम आहे असा **रामायण** शब्दाचा अर्थ आहे.

२. आता तो राम मिळणार कसा? म्हणून भारत सांगितले आहे. **भा = ज्ञान** त्याचे ठिकाणी रत होणे याचे नाव **भारत** आहे.

३ .पण ज्ञानात रत कसे व्हावयाचे? एवढ्याकरता **भागवत** सांगितले आहे. ''आपला उत्तम भाग निवडून घेणे'' हा त्याचा अर्थ आहे.

१. रामायणापासून **अनुकरण** शिकावे लागते म्हणजे डोळ्यापुढे ठेवण्याचे पुतळे रामायणात आहेत.

२. भारतात निरनिराळ्या प्रसंगी कसे वागावे हे

**चातुर्यविशेष** आहे.

३. भगवंताच्या **प्रेमात वेडे कसे व्हावे,** ही गोष्ट भागवतात आहे. ५४१

**२५ परधर्मांची पुस्तके वाचावी की नाही?**

आपल्या धर्माचा विसर पडेल अशा रीतीने ती वाचूं नयेत.स्नेहाने जेवायला बोलाविले असता कोणाच्या येथे जाण्यास हरकत नाही, परंतु परान्नाची रुचि लावून घेणे वाईट तसेच परधर्माची पुस्तके वाचण्याविषयी आहे.

**२६ सर्व धर्मात हिंदुधर्म सर्वांच्या पूर्वी होता हे जसे म्हणतात तसेच सर्वधर्मवेत्ते म्हणतात. तेव्हा खरे कोणते समजावे?** ५४३

ज्या धर्मात ज्ञात गोष्टी अधिक आहेत व अदृष्ट कल्पना कमी आहेत तो तो धर्म जीवप्रणीत असे ठरलेले असून, ऐतिहासिक पुरातनत्व आर्यधर्माकडे येतही आहे.

**२७ पश्चिमेकडे एखादी गोष्ट निघाली की ती आपल्याकडे होती, असे दाखविण्याची पौरस्त्यांना संवय लागली असून त्याला ते वेदाचा आधार देत असतात, हे योग्य आहे**





**काय?**

वास्तविक रीतीने असे प्रयत्न सर्वाकडेच होत असतात. तथापि **'कोणत्याही देशातील कोणत्याही शास्त्राचे मूलतत्त्व आर्य शास्त्रातच आहे'** असे माझे स्पष्ट मत असून 'प्रत्येकाचा प्रयोगातील अनुभव मात्र विशेष आहे'. तथापि जे लोक भौतिकशास्त्रालाही अलीकडे वेदाचाच आधार देतात, त्यामुळे दोन तोटे झाले आहेत.

१- एकतर,'ब्राह्मणांनी विद्या चोरून ठेविली व आम्हाला वेद म्हणू देत नाहीत' असा विवाद इतर जाती करू लागल्या आहेत.

२- दुसरा, ज्या मंत्राचा ते आधार देतात ते मंत्र देवतेच्या स्तुतिपर असतात, पण ते सर्व भौतिकपर लावल्यामुळे देवता मानण्याचे कारण राहत नाही व त्यामुळे भौतिक भागाची उन्नती तर एका मानसिक भागाची अनवती होऊ पाहते.

३- माझे मत तर असे आहे की, 'न्यायादि शास्त्रातून व देवताभंग होत नसल्यास, **वेदातूनही भाषांतराच्या**





**मूळाप्रमाणे सर्व शास्त्रे आपल्याकडे दाखविले तर मोठा उपकार होईल !** ५४४

## जगाचा धर्मग्रंथ : गीता

**२८ सर्व जगाचा धर्मग्रंथ होण्यास पात्र असे कोणी पुस्तक आहे काय?**

होय.पात्र झालेच आहे.ते पुस्तक **''गीतासंवलित महाभारत''** होय. ५४५

**२९ ब्राह्मणांनी इतर लोकास गुलाम केले, असा सर्वत्र ध्वनी आढळतो, याविषयी आपले काय मत आहे?**

सत्पुरुष कोणत्याहि जातीचा असला तरी ब्राह्मणांनी त्याची सेवा करावी असे ज्या अर्थी आमच्या आर्यशास्त्रात सांगितले आहे, त्या अर्थी या ब्रह्मद्विड्ध्वनीत काही अर्थ नाही असे माझे मत आहे.

आर्यशास्त्र म्हणते ते इतकेच की, **एक तर तुम्ही तपाने सर्व गुण मिळवून घेऊन ब्राह्मण व्हा, नाहीतर तपस्वी गुणी मनुष्याला मान तरी द्या.** ५४७





**३० जाती जन्माने, की गुणकर्माने मानावयाची?**

साधारणांची जन्माने व ऋषींची कर्माने. ५४८

**३१ आर्यधर्मात गुरुदक्षिणेचे हे काय बंड आहे?**

असले तरी - आर्य देशात शिष्य आपल्या खुशीने गुरुदक्षिणा देतात व अन्य देशात गुरु शिष्यावर फिर्याद करून ती दक्षिणा घेतात; इतका फरक आहे. ५५०

**३२ आर्यधर्म सनातन कशावरून ठरेल?**

त्याला मुख्य कारण तर **१**- साक्षात्कार व **२**- शास्त्रसमावेश हे असून **३**- सर्व जगांतील इतिहासाच्या सामान्यसत्तेने तो पूर्वसिद्ध आहे, हेही एक गौण कारण आहे. ५५१

**३३ पण आपल्या धर्मात दुसरे लोक येऊ शकत नाहीत, असा हा तुसट व एकटकोंबडा आहे की नाही?**

छे, छे, तसा तर तो मुळीच नाही; परंतु-

१- तो परधर्माचा द्वेष करणारा नसल्यामुळे व ''कोणताही धर्म कधीना कधी तरी सनातन तत्त्वाला जाऊन मिळेल''

असा त्याचा निश्चय असल्यामुळे, धर्मांतील भांडण मोडणारा हाच एक आहे.

२- परधर्मी लोकांना काफर समजून कापून टाकावे असे वेड वैदिक धर्मात कधीच उत्पन्न झाले नाही व होणार नाही.

३- आम्ही वैदिक लोक ज्या आर्ष इतिहासावर विश्वास ठेवतो, तो इतिहास असे सांगतो की, धार्मिक व अधार्मिक लोकांत जरी युद्धे होत असतील तरी धार्मिक व परधार्मिक लोकात या भरतखंडात युद्ध मुळीच झाले नाही.

**या धर्मातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेत उपदेशक आणि योद्धे निराळे ठरले गेले असल्यामुळे खऱ्या धर्मात विकारांची भेसळ झाली नाही.**

यामुळेच आमच्या उच्च धर्माला कित्येक लोक नेभळा धर्म म्हणतात. परंतु या धर्माचे क्षात्रतेज इतिहासप्रसिद्ध आहे. तथापि त्याच्या अविकारी धर्मात मिसळा झाला नाही. याचमुळे 'अविकारी उपदेशक वर्गाचे' महत्त्व आमच्याकडे मोठे झाले आहे.





**३४ जसे इतर धर्मवादी दुसऱ्यांना आपल्या धर्मांत घेतात तसे तुम्हीही तर म्लेच्छादिकांना आपल्या भक्तिमार्गात घेता?**५५२

पण त्यांची इच्छा असली तर आम्ही त्यांना घेतो, तरवारीने त्यांचा धर्मच्छेद करून आम्ही त्यांना घेत नाही.

**३५ राजाने तरवारीने अधर्मी लोकांना दंडावे असे तुमच्या पुराणात सांगितले आहेना?**५५४

सांगितले आहे, पण १- तो ज्या धर्माचा असेल त्या धर्मात त्याला स्थापावे. आपल्या धर्मात ओढून आणावे असे सांगितले नाही.

२- कोणत्याच धर्माचा नाही व जो भयंकर आहे अशालाच राजदंड सांगितले आहेत.

३- वैदिक असोत की तांत्रिक असोत, त्यांना त्यांच्या धर्मात स्थापिले पाहिजे, असे सूतसंहितेचे म्हणणे आहे.

४- परधर्मी मनुष्य नको अशा द्वेषाने खरोखरच युद्ध झाले नाही व होणारही नाही पण हिंदुंची वाणी इतकीच आहे की,





५- परधर्माला आम्ही जसे प्रेमाने वागवितो त्याप्रमाणेच त्यांनीही आमच्या धर्मास प्रेमाने वागवावे. आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नये. परधर्मात ढवळाढवळ करण्याचा स्वभाव हिंदूंचा जन्मलाच नाही.

**स्वतःच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूनी उगे रहावे, म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे, असे का तुझे म्हणणे आहे?**

हिंदूनी युक्तिवादच प्रथम केले. मुसलमानांचा व हिंदूचा धर्मद्वेष तरी धर्मद्वेषाने पडलेला नसून हिंदूंना जीवापेक्षा पलीकडे वाटणारी जी बायकांची अब्रू ती घेतल्यामुळे पडला आहे, असे टॉडकृत राजस्थानच्या इतिहासावरून दिसते. ५५४,५५५

**३६ बौद्ध, महम्मदी व ऐश या धर्मांनी देशचे देश आपल्याकडे ओढले असताही हा आर्यदेश कसा टिकला?**

१- हे तिन्ही धर्म आपल्या धर्माचीच अधिकारानुसार स्वरूपे आहेत, हे भविष्य पुराणावरून आर्यांस ठाऊक आहे.





२- इतर धर्मांत नाही ते आर्यधर्मात आहे व

३- इतर धर्मात आहे तेही आर्यधर्मात आहे आणि

४- आर्यधर्मात नाही ते इतर कोठेही नाही; हे आर्यांच्या सहवासामुळे इतर धर्मीयांना कळू लागले आहे.

५- पुनः इतर धर्मानी जरी आर्यधर्म मोडण्याची खटपट केली तरी आर्यधर्माने इतर धर्म मोडण्याची खटपट केली नाही.

६- याप्रमाणे या आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुतेमुळे आर्यांचा नायनाट करणे विचारी पुरुषांना बरे वाटले नाही.

७- जे जे धर्म हिंदुस्थानात आले त्यांनी त्यांनी शेवटी आपले आर्यांशी ऐक्यच करून घेतले.

८- बौद्धधर्माच्या महायानपंथाशी व शैवपंथाशी एकीकरण झाले होते. याविषयी ''बुद्धो वा च गिरीशोऽथवा'' इत्यादी श्लोक प्रमाण आहेत.

९- पार्शी धर्माचे ऐक्य त्याच्या झालेल्या संस्कृत भाषांतरावरूनच कळते

१०- **''मस्नवी ए मानवी''** इत्यादी सूफी ग्रंथावरून मुसलमान इकडे येण्यापूर्वी सुद्धा त्याच्यात हिंदु

ग्रंथाविषयी आदर होता असे दिसून येते. हिंदु व मुसलमानांचे ऐक्य करणारा ''**दिन् इलाहि**'' या नांवाचा धर्म अकबराने(?) काढला होता. असा इतिहास आहे; आणि

११- ऐश(ख्रिश्चन) व हिंदुधर्माचे ऐक्य करण्याची खटपट आता चाललीच आहे. (थियॉसफी?)

१२- तथापि ही खटपट हिंदूंनी आपल्याकडून करून घेतली असा कोठेही इतिहास नाही, तर दुसरीकडून येथे येवून राहणाऱ्यांनीच हिंदुधर्मालाच भाळून आपले ऐक्य करून घेतले, असाच इतिहास सापडतो.

**दुसरीकडे कितीही जड सुधारणा झाली, तथापि तिचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा सर्वांना शांती आर्यावर्तांतच मिळेल, व याचमुळे आर्यदेश टिकला आहे व टिकणार आहे !** ५५६

## आर्य भारतातलेच

३७ **आर्य लोक जेव्हा इकडे आले तेव्हा येथल्या लोकांना त्यांनी जिंकून आपले दास करून त्यांना दस्यू म्हटले, तेव्हा जातिभेद हा**





**धर्मजुलूम नाही काय?**

''आर्य लोक इकडे आले'' ही उपपत्ती अलिकडेच निघाली आहे. ''ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीनच वर्ण आर्यांचे असून शूद्रवर्ण हा येथील दस्यू लोकांचा आहे,'' असे म्हणणे, ही उपपत्ती मानणाऱ्यांचे (लोकमान्य टिळक)आहे व ही उपपत्ती मानणारे देशाचे पुढारी म्हणवितात. --परंतु त्यांच्या ''या उपपत्तीमुळे शूद्रांचा व ब्राह्मणांचा कायमचाच द्वेष राहण्याची पाळी आली आहे.''

''या लोकांनी कायमचेच आम्हांला गुलाम करून घेतले आहे'' असा समज या उपपत्तीमुळे शूद्रांच्या मनामधून कधीही नष्ट होणे शक्य नाही; व त्यामुळे कितीही सवलती दिल्या तरी कायमचा कलह राहतोच.

शिवाय, आम्हाला गुलाम करण्याकरताच वेदाचा अधिकार यांनी आम्हाला दिला नाही, ही समजूत या उपपत्तीमुळे दृढ होण्याचा संभव आहे. चातुर्वर्ण्य हे गुणकर्मसिद्ध किंवा जन्मसिद्ध याचा संशय व वरील प्रकारची भाषणे मी धर्मपरिषदेतून पुढाऱ्यांची ऐकली





आहेत.

**चातुर्वर्ण्य गुणकर्मसिद्ध असो की जन्मसिद्ध असो, दोन्ही पक्षात शूद्रवर्ण हा गुलाम नसून आर्यांचाच एक भेद आहे, हेच मला दाखवावयाचे आहे. ....**गुलामी वर्णभेद आर्यांमध्ये नाही.

'विराट पुरुषाच्या मुखापासून झालेले ब्राह्मण, बाहूपासून झालेले क्षत्रिय, उरूपासून झालेले वैश्य व पायांपासून झालेले शूद्र' असे पुरुषसूक्तात म्हटले आहे.

महाभारत शांतिपर्व, अ. १८८ मोक्षधर्माच्या क्रमाने अ. १५,श्लोक १० ते १३ यांतही गुणकर्मपक्षी असे म्हटले आहे की,

**न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।**
**ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ।।१०।।**
**कामभोगप्रियास्तीक्ष्णाः क्रोधनाः प्रियसाहसाः ।**
**त्यक्तस्वधर्मा रक्तांगाः ते द्विजाः क्षत्रतां गताः ।।११।।**
**गोभ्यो वृत्तिं समास्थाय पीता कृष्युपजीविनः ।**
**स्वधर्मान्नानुतिष्ठन्ति ते द्विजाः वैश्यतां गताः।।१२।।**
**हिंसाऽनृतप्रिया लुब्धाः सर्वकर्मोपजीविनः ।**





**कृष्णाः शौचपरिभ्रष्टाः ते द्विजाः शूद्रतां गताः।।१३।।**

या श्लोकाचा अर्थ स्पष्टच आहे; व यावरून,

**शूद्र हा द्विजांचाच भेद आहे, गुलाम नव्हे.** हेही उघड होत आहे.

जन्मपक्षी व गुणकर्मपक्षी प्राचीन लोक शूद्राला गुलाम मानीत नव्हते.

## वेद अपौरुषेय

आता कोणी असे म्हणेल की, पुरुषसूक्त अलीकडे झाले; तर वेद जीवकृत आहेत असे म्हणणाऱ्यालाच ते शोभेल. वेद पौरुषेय आहेत असे मत अलीकडेच निघाले आहे, प्राचीन नव्हे. *(गुलाबरावमहाराजांनी संप्रदायसुरतरूत वेदांच्या अपौरुषेयत्वाची युक्तीने व योगाने सिद्धी केली आहे, ती अवश्य पहावी)*

वेदाचा अधिकार, जन्मपक्षी पायापासून झाले म्हणून व गुणकर्मपक्षी वाईट म्हणून, परमेश्वराने शूद्राला दिलेला नाही. त्याचमुळे ब्राह्मणांचा निरुपाय झाला. गुलामगिरीमुळे शूद्रांचा अधिकार, ब्राह्मणांनी छिनून घेतला हे म्हणणे धाडसाचे आहे.

मनूने तर म्लेंच्छदेखील क्रियात्यागानेच झाले असे म्हटले आहे.(अ.१०) --

**शनकैस्तु क्रियालोपात् इमा क्षत्रियजातयः ।**
**वृषलत्वं गता लोके ब्राह्मणाऽदर्शनेन च ।।४३।।**
**पौंड्रकाश्चौंड्रद्रविडाः कांबोजाः यवनाः शकाः ।**
**पारदाः पल्लवाश्चीनाः किराताः दरदाः खशाः।।४४।।**

याप्रमाणे म्लेच्छांची उत्पत्ती मनूने सांगितली असून क्रियालोपानेच त्यांना दस्यूपणा आला, हे पुढील श्लोकात सांगितले आहे.

**मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।**
**म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ।।४५।।**

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे जेव्हा क्रियाभ्रष्ट झाले तेव्हा ते दस्यू म्हटले गेले, असा या श्लोकांचा अर्थ कुल्लुकभट्टाने केला आहे. तेव्हा -

**'शूद्र' हा आर्यां पैकी वर्ण नाही, हे म्हणणे देशक्षोभकारकच आहे..**

संकरवर्णातील रथकाराला देखील अग्न्याधान आहे; तेव्हा असंकर अशा शूद्रांशी वेदाधिकार ब्राह्मणांनी





मुद्दाम चोरून ठेवला असेल हे संभवत नाही. रथकारापेक्षा स्वतःच्या बायकोची ब्राह्मणाला अधिक जरूर आहे, परंतु स्त्रियांला वेदाचा अधिकार नसल्यामुळे मातेलाही त्यांनी वेद शिकविले नाहीत. ब्राह्मणी धर्मात मातेची सेवा करण्याविषयी पुत्राला उत्तम शिक्षा दिलेली आहे. तेव्हा सर्वच ब्राह्मणपुत्र कृतघ्न आहेत असे म्हणता येत नाही. म्हणून ही **'आर्यागमनोपपत्ति'** व्यर्थ भेदकारक असल्यामुळे मान्य करता येत नाही.

आता या उपपत्तीचे उत्पादक(लो.टिळक) राष्ट्रीयपक्षामुळे लोकांना मान्य झाले आहेत, म्हणून त्यांच्यावर टीका करणाऱ्या माझा बहुजन उपहास करणार आहेत, हे मी जाणून आहे; पण - धार्मिक दृष्टीने माझे म्हणणे बरोबर आहे, हेही मी जाणून असल्यामुळे बहुजनमताला मी भीत नाही. ५५७

**३८ धर्मनिर्णय बहुजनमतावर अवलंबून नाही काय?**

१- समान अधिकारात तो बहुजनमतावर अवलंबून आहे,
२- वैराग्यादिकांचे न्यूनाधिक्य असले तर तो एकाच्या





मतावरच अवलंबून आहे. ....५५८

**३९ विद्वान खरा पराजय झाला असे केव्हा समजतात?**

'स्वविद्येचे स्थान परत्र आहे' असे सिद्ध करणे, याला विद्वान खरा पराजय मानतात; कारण याच्या योगाने स्वबुद्धीच नामशेष होत असते.५५९

**४० तर मग सनातनधर्मी लोक परक्यांचे गुण घेतच नाहीत असे म्हणावयाचे?**

भलतेच बोललास ! आधी तर आम्हाला परके म्हणून कोणी वाटत नाहीत; कारण सर्व लोक पूर्वी एका वर्णाचे असून पुढे ते आपापल्या कर्माप्रमाणे भिन्न झाले असे महाभारतात सांगितले आहे; आणि एका वर्णाचे कां? तर एका ईश्वराने उत्पन्न केले आहेत म्हणून! असाही तेथे अर्थ सांगितला आहे....शिवाय आमच्या विद्येचा पारकीय विद्येने सर्वस्वी पराजय केला असे कोणाचे मत असले, तर हेव्हेल वगैरे आमच्या विद्येला चांगले म्हणणारे आहेत, इकडेही त्या मतवाद्यांनी लक्ष दिले पाहिजे.

पारकीय लोकांनी आमची असूया केली असलीच





तर त्या असूयेचा निषेधही पारकीय लोकांनीच केला आहे.

आमच्या संगीताविषयी 'डे'साहेबानी वाईट उद्गार काढले आहेत, तर दुसऱ्या एका साहेबाने 'आपले संगीत फार स्वाभाविक व रोग दूर करणारे आहे' असे उद्गार काढलेले आहेत. आमच्या कलेविषयी काही साहेबांनी वाईट उद्गार काढले असतील, तर 'हेव्हेल' प्रभृती साहेबांनी त्यांचे खंडण करून चांगले उद्गारही काढले आहेत.

पारकीय लोकात शांतता इच्छिणारा पक्ष बहुधा सनातन धर्माचा अनुयायी होत चालला आहे.

-परंतु आमच्यामध्येच विकाराच्या योगाने धर्माचा नाश करणारे, ब्राह्मणद्वेष करणारे, आपल्याला शर्मा वगैरे पदवी धारण करणारे काही लोक, पारकीयांनी काढलेले वाईट उद्गार तेवढे घेऊन व चांगल्या उद्गारांकडे दुर्लक्ष करून आमच्या विद्या कुचकामाच्या म्हणून ठरविण्याचा प्रयत्न करतात.

वास्तविक या लोकांना ब्राह्मण्य किंवा वैदिकत्व जर पाहिजे आहे, तर ते आमच्या प्राचीन विद्येचा धिक्कार

केल्याने कधीच मिळणार नाही, कारण तशा धिक्काराने उलटे त्यांचे नवीनत्वच सिद्ध होणार आहे.

बरे, ब्राह्मणांनी विद्या चोरून ठेविली असा एक पक्ष घेऊन चालले तरी ब्राह्मणवर्गच पूर्वीचा सुधारलेला आहे असे ठरत नाही काय? कारण ज्याची विद्या त्यानेच चोरण्याचा संभव आहे. दुसऱ्याची विद्या चोरून ठेवण्याचा संभव नाही. ब्राह्मणद्वेष्ट्या व वर्णाश्रम न मानणाऱ्या या लोकांचे उद्‌गार विलक्षण परस्परविरोधी असतात.

**१-** ...''पूर्वी जाती नव्हत्या, नंतरच शंकराचार्याने आपल्या भट्टीतून त्यांची उत्पत्ती केली.''

**२-** ...''जेव्हा जेव्हा ब्राह्मणांच्या हाती विद्या गेली तेव्हा तेव्हा त्यांनी ती दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला व क्षत्रियांच्या हाती गेली तेव्हा तेव्हा त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला, याविषयी उपनिषदात अनेक दाखले आहेत.''

- शंकराचार्यांच्या भट्टीतूनच जर जातीची उत्पत्ती आहे. तर त्यांच्या पूर्वी असेलल्या उपनिषदात क्षत्रिय, ब्राह्मण इत्यादि वर्ण कसे सांपडतात? ...

आता पूर्वी गुणकर्मानुसार ब्राह्मणादि वर्ण होते,





असे त्यांचे म्हणणे आहे; पण असे घेऊन चालले तर सर्व गुणांचा खाणी ब्राह्मणच होऊ पाहतात. तेव्हा विद्या दाबून ठेवणे हा दुर्गुण उपनिषत्कालच्या ब्राह्मणात तरी ...त्यांच्या दृष्टीने असणे संभवनीय नाही. मग ब्राह्मणांनी विद्या दाबून ठेवली व क्षत्रियांनी ती प्रकट केली हे अनुमान उपनिषदावरून कसे काढले?

...ब्राह्मणद्वेष करून जरी ब्राह्मण्य पाहिजे असले, तरी 'द्वेष्टृवर्गाला ब्राह्मणाच्या विद्येचा द्वेष केल्याने ते कधीच मिळणार नाही'...

ज्या अर्थी शोधान्ती पारकीय लोकांचे आमच्या विद्येविषयी उद्‌गार चांगले निघतात, आणि तिकडे दुर्लक्ष करून आम्हीच आमच्या विद्येला वाईट म्हणतो, त्याअर्थी त्याला 'ब्राह्मणद्वेष' या विकाराशिवाय दुसरे काही कारण नाही असे मी स्पष्ट म्हणतो.

गुणकर्माने वर्णव्यवस्था मानली तर सर्व चांगल्या गुणांचा वर्ग ब्राह्मणच असल्यामुळे वाईट वर्गाने त्यांचा द्वेष करणे उचित होत नाही; आणि

--जन्मसिद्ध वर्ण मानले तर मग ईश्वरयोजनाच





तशी असल्यामुळे कोणाचाही कोणालाही द्वेष करण्याचा अधिकार नाही.

गुणांनी चांगले असणाऱ्या ब्राह्मणांनी ग्रंथ लिहिले असतील, तर त्यात कमीपणा असूं शकत नाही; आणि वाईट लोकांनी लिहिले असतील, तर त्यांच्या वेदाकरताही हपापण्यात काही अर्थ नाही.

**''धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा,**
**शूद्रवर्गात,**
**सृष्टीमध्ये मी एकटाच आहे,**
**असे तूं पक्के समज !''**

माझे मत असे आहे की, अदृष्ट ज्या पद्धतीने उत्पन्न होईल त्या पद्धती अधिकारानुसार ज्याला त्याला सारख्याच आहेत. म्हणून -

**ब्राह्मणांचा वैदिक धर्म व शूद्रांचा पौराणिक धर्म एकरूप असून समश्रेयस्कर आहे.** ५६०

**४१ देव जर निराकार आहे तर मूर्तिपूजेचे बंड आर्यधर्मांत कां?**

अरे, देव निराकार आहे म्हणूनच! कारण तो जर





साकार असता तर त्याची मूर्ती एखाद्या मेलेल्या माणसाच्या पुतळ्या प्रमाणे स्मारक मात्र झाली असती.

पण परमात्मा निराकार आहे म्हणूनच कोणत्याही मूर्तीत शिरून, पाहिजेल त्या भक्ताला तो 'ओ' देण्यास तयार असतो. ''देवा, आमची भाकर आम्हाला असू दे.'' इत्यादिक काही(खिश्चन) लोकांच्या प्रार्थना निराकार देव कसा ऐकतो?... शिवाय, प्रत्येक धर्मांत काहीना काही तरी साकार चिन्हे असतातच, पण ती कोण्या तरी मेल्याचे स्मारक समजल्या जातात व आम्ही मूर्तीला नित्य अशा परमेश्वराचे प्रतीक म्हणतो एवढेच ! ५६०

**४२ तुमच्या आर्यधर्मांतील लोक परमार्थ असा झांकून झाकून कां ठेवीत असतात? बोलून चार शंका समाधान करणे यातही झांकून ठेवणे कशाला पाहिजे?...**

१- ग्रंथात कितीही लिहिले तरी कोणत्याच गोष्टी बरोबर समजत नसतात.

२- दुसरे, ग्रंथातील ज्ञान अनधिकारी लोकांच्या हाती

जात असते; व त्यामुळे पुरे परमार्थी नसूनही पुस्तके वाचून नुसते लोकांना ज्ञान सांगणारे निपजत असतात. असे ज्ञान उघड होऊ लागले म्हणजे व्यवहाराचीच किंमत लोकांना जास्त वाटूं लागते. ५६७

**४३ तर मग शास्त्र व्यर्थच झाले म्हणावयाचे?**

छे, तसे मुळीच नाही. भलतेच मत शिकवूं नये म्हणून शास्त्र आहेत. परंतु ते शास्त्रच अनधिकाऱ्याच्या हाती जाऊ द्यावयाचे नाही व गेले तरी त्याचा इष्ट परिणाम होत नाही, म्हणून आमच्या आर्य धर्मात परमार्थ झाकून सांगण्याची वहिवाट आहे. ...

**वैय्यक्तिक निंदेने किंवा लढाई करून धर्म स्थापण्याची आम्हा आर्यांना कालत्रयी संवय नाही. धर्मद्वेषाचा विटाळ तर आम्हा आर्यांना माहीतच नाही.** -म्हणूनच अनेक इतर धर्मीलोकांना आमच्याकडे पाहून लाज वाटून घेऊन आमच्या धर्माशी आपल्या धर्माचे ऐक्य करावे लागले, असा इतिहास सांपडतो.

(१) बुद्धधर्मातून महायान व शैव पंथाचे ऐक्य,





(२) महम्मदी धर्मातून दिनइलाही सारखे पंथ,

(३) जैनधर्मातून समयसारासारखे ग्रंथ आणि

(४) ईशपुत्रधर्मातून ब्रह्माभासविद्येसारखी मते, (थियॉसफी) आम्हा आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुते मुळेच झाली आहेत. ५६८

**४४ हिंदुधर्मस्थापक ऐतिहासिक नाहीत, असे पुष्कळशा लोकांचे म्हणणे आहे?** ५७०

(१) असेना बापडे, ईशपुत्रधर्मस्थापकही ऐतिहासिक नाही, असे कहानचंद्रवर्माने सिद्ध केले आहे.

(२) तसेच ईशपुत्रचरित्र व महम्मद चरित्र ही रूपके आहेत, असे म्हणणारे लोक पश्चिमेकडे आहेत.

(३) बुद्ध ही कोणी ऐतिहासिक व्यक्ती नव्हती; सूर्याच्या उपासनेपासून ती घेतली गेली असावी, असेही पाश्चिमात्य म्हणतात.

याप्रमाणे कोणताच धर्मस्थापक नव्हता, तर पृथ्वीतील सर्व लोक कल्पित कादंबरीचीच उपासना





करतात काय? आणि तसे असेल तर हा स्वपक्षदोष आहे. जेथे शंका व परिहार सारखेच असतात, तेथे एकाने दुसऱ्यास विचारूं नये, असा तर्कनियम आहे. ५७०

**धर्मस्थापक**

*(४१ गुणांनी संपन्न असावा)*

**४५ धर्मस्थापक कसा असावा ?** ५८४

१- शास्त्राधाराने त्याने रूढीची पर्वा करू नये; तशीच रूढीची फार पायमल्ली करू नये.

२- उच्चानीच वर्गाकरिता शास्त्राधाराने ऐहिक व पारलौकिक सोय त्याला सांगता यावी.

३- पतिव्रता असो की वेश्या असो, ते शरण आल्यावर त्यांच्या त्यांच्या अधकिारानुसार त्याला मार्ग दाखविता आला पाहिजे.

४- अति शांत असणे व अति रागवणे त्याला कामाचे नाही.

५- एखाद्या व्यावहारिक नियमावर अति आग्रह धरणे त्याला उपयोगाचे नाही.





६- भिक्षा मागण्याची व पलंगावर निजण्याची, ह्या दोन्ही संवयी त्याला पाहिजेत.

७- फार कठीण व फार सोपी, अशा दोन्ही तऱ्हेच्या भाषा वापरणे त्याने सोडून दिले पाहिजे.

८- आळशी व लबाड असे विद्वान असले तरी ते टाळले पाहिजेत आणि प्रामाणिक मूर्ख असले तरी त्यांचा संग्रह केला पाहिजे.

९- कोणत्याच मतावर आरूढ नाहीत अशा कुतर्कियांशी संवाद टाळला पाहिजे.

१०- संघाला जपले पाहिजे. संघभंगकाची उपेक्षा केली पाहिजे, आणि संघभंगक शरण आल्यास संघाधस्तर नियम सांगून त्याची परीक्षा पाहिली पाहिजे.

११- प्रत्येकाला बुद्धीने पटवून देण्याची आंगात धमक पाहिजे. संघभंगकाशी मात्र बुद्धिवाद टाळला पाहिजे.

१२- ज्या धर्माची स्थापना करावयाची असेल ते शास्त्र त्याला अवगत पाहिजे.

१३ - चालू भाषेत उपदेश केला पाहिजे आणि मूळ धर्मभाषा नष्ट होणार नाही अशी टीका वगैरे करून

खबरदारी घेतली पाहिजे.

१४- चमत्कार होत असले तरी त्यांचा आपल्या हाताने निषेध केला पाहिजे. तसेच आपल्या गुरूचे व दुसऱ्याचे जे चमत्कार असतील त्यांचा निषेध न केला पाहिजे.

१५- अत्यंतच लोकविरुद्ध असल्याशिवाय त्याने एखाद्या चालीचा स्पष्ट निषेध करता कामा नये.

१६- कर्तव्य बुद्धीने पटवून देऊन, फल त्याने शास्त्राने दाखवून दिले पाहिजे.

१७- संपन्न लोकांना व आपन्न लोकांना त्यांच्या त्यांच्या परिस्थितिप्रमाणे तत्त्व न सोडता त्याने नियम घालून दिले पाहिजे.

१८- देशापन्न, कालापन्न व अवस्थापन्न, लोकांना निर्भीडपणे त्याने कर्तव्य सांगितले पाहिजे. करकाळ (थंडीच्या) देशांत राहणारे लोक देशापन्न समजले जातात. कलीने मारलेले कालापन्न होत. आणि रोगामुळे दीन झालेले अवस्थापन्न समजावेत; आणि याविरहित ते सर्व संपन्न होत.

१९- आपल्या आचरणावर, ध्यानावर व ज्ञानावर त्याचा





दृढ विश्वास पाहिजे; आणि हे कार्य करण्यात कोणत्याही प्रकारचा विकार नसला पाहिजे.

२०- वडील विद्वानाला त्याने नम्रतेने वश केले पाहिजे, बरोबरीच्यांना वादाने जिंकले पाहिजे किंवा मैत्री केली पाहिजे, आणि कमी विद्वानांच्या विद्येची त्याने सुधारणा केली पाहिजे.

२१- पृथ्वी जरी आपल्यावर अवलंबून असली तरी त्याने तिच्यावर अवलंबून राहता कामा नये; आणि

२२- विघ्नाने मरण्याचा प्रसंग आल्यास स्मृति आहे तोपर्यंत धर्मवाक्येच तोंडातून काढली पाहिजेत.

२३- आपल्या उपदेशाप्रमाणे जेथे वर्तन होत नसेल, ते लोकांना स्पष्ट दाखवून दिले पाहिजे.

२४- जुना सिद्धान्तच कळण्यासाठी कोणताही नवीन सिद्धांत त्याने स्थापला न पाहिजे.

२५- जुन्या सिद्धान्तावर हजारो नव्या प्रकिया त्याला रचता आल्या पाहिजेत.

२६- 'मलाच भजा' असे म्हणण्याला त्याने तिलांजुली दिली पाहिजे.





२७- 'मी परमेश्वर तसे तुम्हीही आहात' असे त्याला ठासून सांगता आले पाहिजे, आणि

२८- जे जे धर्मकार्य होऊन गेले असेल, त्याविषयी त्याला विरक्त बनले पाहिजे. शिथिल पडूं लागल्यास सरसावले पाहिजे.

२९- मत्सरग्रस्त समाज फार असेल तर भाविक समाजालाच हाती धरले पाहिजे.

३०- सकाम लोकांना आपल्या उपास्याकडे बोट दाखविले पाहिजे.

३१- आणि ज्याच्या त्याच्या कर्तव्यावांचून इतर आपण काय करतो, हे कोणालाही कळू देता कामा नये.

३२- आपण मोठे कार्य केले, असे तर मनात देखील वाटले न पाहिजे.

३३- लीनतेचा व अभिमानाचा प्रसंगानुसार उपयोग केला पाहिजे.

३४- राजा शरण आला तरी त्याचा पैसा न घेता त्याला उपदेशच केला पाहिजे.





३५- मूर्खासमोर कूटार्थ बोलले पाहिजे.

३६- देवाला भजले पाहिजे.

३७- अतिथीला तोषविले पाहिजे.

३८- सद्‌गुरूला सेविले पाहिजे.

३९- सेवकांना पाळले पाहिजे.

४०- आणि कालिक जे धार्मिक उपाय समजले गेले असतील त्यांच्याशी उपदेशाचे ऐक्य केले पाहिजे.

४१- शिष्य करणे व न करणे हे प्रसंगावर अवलंबून ठेविले पाहिजे.

याप्रमाणे जो गुणसंपन्न आहे तोच **धर्मस्थापक** होतो; इतर **पंथस्थापक** होत. ५८४

**४६ धर्मस्थापकाने गादी स्थापन करावी की नाही?**

उपास्याची गादी स्थापन करावी असे मला वाटते, उपासकाची गादी स्थापन करू नये; आणि वल्लभांप्रमाणे आनुवंशिक गादी तर कधीच स्थापन करू नये. तथापि विद्वान शिष्याकरता व्यवस्था करून ठेवावी. वारकरी धर्माने

या बाबतीत शहाणपणा केला आहे. ५८६

## तत्त्वचर्चा

**४७ सत्य कशास म्हणतात ?** ५८९

ज्याला जे टिकाऊ वाटते तेच त्याचे सत्य!

**४८ ज्ञान पुस्तकांवर अवलंबून आहे, की लोकनिरीक्षणावर?**

पारमार्थिकज्ञान गुरु व शास्त्रावर अवलंबून असून, व्यावहारिकज्ञान लोक-निरीक्षणावर अवलंबून आहे. ५९९

**४९ उत्क्रांतिवाद तुम्हास मान्य आहे काय?**

मला उत्क्रांतिही मान्य आहे व अपक्रांतिही मान्य आहे कारण उत्क्रांति-वादाला संमती देणे व अपक्रांतिवादाला न देणे हे बुद्धीच्या दृष्टीने सभ्यपणाचे नाही. या दोन्ही वादांचा अंतर्भाव आमच्या **गमनागमन सिद्धान्तात** झाला आहे. ६१२

**५० नीति कशाला म्हणतात ?**

धर्माकरता समयानुसार सांगितल्या जाणाऱ्या





व्यावहारिक नियमांना! ६१३

**५१** धर्मशास्त्र व नीतीशास्त्र कसे शिकावे?

* धर्मशास्त्र अंतःस्फूर्तीचे असल्यामुळे गुरुशास्त्रापासून शिकावे आणि
* नीतिशास्त्र अनेक लहानसहान सुद्धा अनुभव गोळा करून शिकावे.

भीष्मांनी महाभारतात धर्माला म्हटले आहे की, 'हे मी सर्वच काही वेदाच्या आधाराने सांगत आहे असे तूं समजू नकोस शहाण्याच्या अनुभवातून गोळा केलेले हे मधू आहे असे समज.' ६१४

**५२ लोकांच्या टीकेला केव्हा भ्यावे व केव्हा भिऊ नये?**

१. आपण वास्तविक वाईट कर्म करू नये व

२. लोकांना धार्मिक उपसर्ग लागूं देऊ नये;

या दोन गोष्टी पाळल्या गेल्या म्हणजे कोणत्याही लोकांच्या टीकेला भिऊ नये.

**५३ नीतीचा व धर्माचा स्पष्ट भेद आर्य लोकांना ठाऊक नाही काय?**





ठाऊक असला तरी धर्माच्या बाहेर कोणत्याही गोष्टीला आर्य लोक जाऊ देत नाहीत. म्हणूनच ते गौणप्राधान्याने महत्त्व देत असतात.

१- **नीति** ही ऐहिकसुखफलप्रधान असून

२- **धर्म** हा पारलौकिकफलप्रधान आहे.

३- **अर्थ व काम** हे दोनच पुरुषार्थ नीतिवेत्ते मानीत असतात' असे सर्वदर्शनसंग्रहात स्वामी विद्यारण्यांनी सांगितले आहे.

चांगला असला तरी, 'बहुतांकरता एकाचा त्याग करणे आणि स्वार्थाकरता बहुतांचा त्याग करणे' हे आचरण नीतीतच मोडते.

आता नीतिवेत्ते कधीकधी स्वार्थाचा त्याग करतात, पण त्यातून दुसरा ऐहिक मोठा स्वार्थ पहात असतात.

**आपद्धर्म** हे नीतीच्या व धर्माच्या मिश्रणाने झाले आहेत तथापि त्यात वैदिक धर्माचे स्वरूप शुद्ध दृष्टीस पडते म्हणूनच त्यास आपद्धर्म म्हणावयाचे.

मोह करणारे पंथ उत्पन्न करणे इत्यादी गोष्टी





नास्तिक नीतिवेत्त्यात मोडतात.

नीतिवेत्त्यामध्ये नास्तिक व आस्तिक यांचा भेद नाही, पण धार्मिक पुरुषाला मात्र आस्तिक असावेच लागते. नीतिवेत्ते कधी कधी दुसऱ्याच्या धर्मात हात घालीत नाहीत, परंतु ते धर्माच्या प्रेमामुळे नसून धर्माच्या औदासीन्यामुळे असते आणि दुसरा ऐहिक स्वार्थ त्यांना त्यापासून मिळावावयाचा असतो. शिवाय,

**नीतिवेत्ते हळुहळू प्रत्येकाची धर्मश्रद्धा क्षीण करीतच असतात.**

नीतिवेत्त्यांचे पारडे कोण्या एकीकडे अधिक झुकले की ते नाश पावतात. ६१८

**५४ चांगले कार्य कोठे कसे समजले जाते?**

१- धर्मात शास्त्रानुसार करणे चांगले समजल्या जाते.

२- धर्माला विरोध येणार नाही असे व्यावहारिक कार्य लोकांनुसार चांगले समजल्या जाते. आणि

३- शारीरिक कार्य ज्याच्या योगाने प्राण वाचेल असे चांगले समजल्या जाते. ६२०

**५५ मनुष्याची साधी परीक्षा कशावरून करावी?**

लहानसहान संवयीतील त्याच्या वृत्तीवरून! मोठे काम विकाराने किंवा लाजेने प्रसंगी कोणीही करू शकतो. ५२२

**५६ सुख पैशात आहे की गरिबीत आहे ?**

गरिबीत आहे. कारण शरीराचा व मनाचा काटकपणा तिने वाढतो. ६२५

**५७ गुणदोष दाखविण्याला मर्यादा आहे काय?**

होय. कारण कोणत्याहि पदार्थाकडे चांगल्या व वाईट दोन्ही दृष्टीने पाहता येते. ६२६

**५८ दोष केव्हा गणावे व केव्हा गणूं नयेत ?**

आपत्तीत गणू नयेत व संपत्तीत गणावे. तुलसीदास 'दुखितदोखगुण गनहि न साधु' ६२७

**५९ कोणाच्या गुणाला दोषरूप समजावे ?**

निस्पृह नसून जो उद्धट आहे त्याच्या! ६२७

**६० मनुष्य देव आहे की पशू ? ६२९**

'विचाराने तो देव आहे व शरीराने पशू आहे.' म्हणूनच मांस न भक्षणाऱ्या पशुपक्ष्याप्रमाणे त्याची





शारीरिक वागणूक प्रसंगी हिताची होते, व अत्यंत विचारामध्ये त्याची वागणूक देवाप्रमाणे हिताची होते. **'विचाराचा शरीरावर ताबा ठेवणे हे मनुष्यत्व होय.'**

**६१ कार्यसाधू कोण ?**

मिष्ट वक्ता ! ६३०

**६२ कार्यविघाती कोण?**

क्रूर वक्ता ! ६३१

**६३ अपराधी कोण ?**

आपल्याला ओळखत नाही तो ! ५३२

**६४ न्यायी कोण ?**

शरण येईपर्यंत चुकीविषयी ज्याची करडी नजर असते तो ! ६३३

**६५ मुका कोण ?**६३४

सत्य न समजून उगेच बोलणे सोडतो तो!

**६६ बोलका कोण ?**

विचार न करता प्रसंगी ज्याला चांगले सांगता येते तो ! ६३५

**६७ दरिद्री कोण ? ६३६**





ज्याच्या अंतःकरणात अतिशय तृष्णा आहे तो

**६८ श्रीमंत कोण ?**

संतुष्ट. ६३७

**६९ गुह्य कोणाजवळ झांकून राहते ?**

जो कोणावर फार कृपाही करीत नाही व कोणावर फार रागावतही नाही त्याजवळ! ६३८

**७० हितैषी कोण ?**६३९

जो अंधारात आपले दोष गोड शब्दाने दाखवितो तो!

**७१ चोरात व शूरात काय फरक आहे? कारण दोघेही खुनारीच असतात?६४०**

पहिल्याला वाचण्यात धन्यता वाटते व दुसऱ्याला मरण्यात धन्यता वाटते, हाच त्यांच्यामध्ये फरक आहे.

**७२ नित्य विलासी कोण ?**

ज्याला योग्य वेळी सुखाने झोप येते व योग्य वेळी सुखाने जागतो तो! ६४१

**७३ धीर कोणास म्हणावे ?**

लहानसहान गोष्टीतही जो मोठेपणाची कामे करतो त्यास ! प्रसंगी मोठेपणाची कामे तर एखादा





लहरीही करू शकतो. पण त्याचा तो उदारपणा सर्वकाळ नसतो. अतिदान करून अतिकृपणता असणाऱ्या व्यक्ती मी पाहिल्या आहेत. विकाराच्या झपाट्यात साधारण मनुष्यही हरिश्चंद्रासारखे बायकोचे दान करण्यास उभा राहतो! परंतु ती त्याची उदारता सर्वत्र नसते. ६४२

**७४ क्षमेत व दयेत काय फरक आहे?** ६४३

अपराध केला असता दंड न देणे याला क्षमा म्हणतात आणि अपराध न करणारा असून दुःखात पडलेला असेल तर त्याला काढणे याला दया म्हणतात.

**७५ ईर्ष्या कोटे,कशाविषयी धरावी व धरूं नये?**

हेतुविषयी ईर्ष्या धरावी, फलाविषयी धरू नये; तशीच लौकिकात ईर्ष्या धरावी,धर्माधर्मात धरूनये. ६४५

**७६ स्तुतिप्रियता हा गुण आहे की दोष आहे ?**

वरिष्ठांच्या हातून स्तुती करून घेणे दोष असून, लहानांच्या हातून स्तुती करून घेणे गुण आहे. 'तू मोठा साधू असशील तर स्तुतीने फुगून जाऊ नको. पण आपले दुःख व्यक्त करण्याला गरिबाजवळ स्तुतिशिवाय दुसरे काही नसते, इतके लक्षात ठेवून त्याच्याशी वाग.' ६४६

**७७ महाभारतात 'ज्याच्या पुण्याची कीर्ती आहे तो स्वर्गाला जातो व ज्याची अपकीर्ती आहे तो नरकाला जातो' असे सांगितले आहे; आणि इतरत्र कीर्तीची निंदा केली आहे, हे कसे?**

निंदा विरक्ताकरता असून, गृहस्थाकरिता कीर्ती आवश्यक आहे.
कपटाने कीर्ती करून घेणारे जे असतात त्यांचा निषेधच केला आहे. म्हणून तसे करू नये. हाही कीर्ति-निंदावचनांचा अभिप्राय आहे. मुक्त तर मानापमानाचे ठिकाणी समान असतो, असे गीतेत सांगितले आहे. ६४७

**७८ आत्मस्तुति करून घेणे कोणास बाधक नाही व कोणास बाधक आहे?**

१- शूर.
२- बाहुबलाने तरून जाणारा.
३- संकटात पडलेला असून मागे पाय घेण्याची इच्छा नसणारा.





४- अनेक अधर्मी लोकांच्या टोळीमध्ये सांपडलेला एकटा धार्मिक.
५- पाय घसरून पडलेला आणि
६- पतिव्रता स्त्री.

या सहांना खरी आत्मस्तुती करून घेणे बाधक नाही. बाकी सर्वांना बाधक आहे. ६४८

**७९ गर्व कोठे करावा व कोठे करू नये?**

१- बुडणाऱ्याला वर काढताना,२- न्यायाने विजय मिळविताना. ३- स्त्रीचे सांत्वन करताना, आणि ४- मुलाला उपदेश करताना गर्वोक्ति हिताच्या असतात व इतर सर्व वेळी त्या अहितकारक असतात. ६४९

**८० निरूपयोगी कोण ?**

पुष्कळ काम करीतच आहेत, मी एकट्याने नाही केले तर काय झाले, असे मानणारा! ६५१

**८१ सदुपयोगी कोण ?** ६५२

मी जर एखादे काम केले नाही, तर दुसऱ्याने ते केले असे तरी कां म्हणावे?माझ्या शुद्धतेवरच सर्व जगतूशुद्धता अवलंबून आहे असे ज्याला वाटते तो!





**८२ मोठ्या कार्यात प्रत्यक्ष विघ्न कोणते ?**

पिशुनाचं वाईट बोलणे ऐकून मनास वाईट वाटून घेणे! ६५३

**८३ स्वार्थ कोणाचा शोभतो व कोणाचा शोभत नाही?**

धर्मानुसार शिष्टांची सेवा करणाऱ्याचा स्वार्थही शोभतो. जो निस्पृह नसून शास्त्राने सवलत दिलेली साधूची लौकिक लक्षणे आपल्या आंगी लावून घेतो त्याचा स्वार्थ शोभत नाही. ६५४

**८४ आपले दुर्गुण प्रगट करावयाचे असल्यास प्रथम जवळच्या लोकात करावे की दूरच्या?**

खरा पश्चात्ताप झाला असेल तर प्रथम परक्या लोकात प्रगट करावे, कारण जवळचे लोक मूर्ख असल्यास, 'आम्हाला हे पूर्वी माहीत होते म्हणून यांनी सांगितले' असे समजून पश्चात्ताप खरा असला तरी हांसतात. ६५५

**८५ खोटे बोलणे कधी तरी छपविता येते काय?**





सर्व प्रकारे कधीच व कोणालाच छपविता येत नाही. कारण ते अत्यंत अस्वाभाविक आहे. पापमय अशा तिर्यक् प्राण्याला देखील अत्यंत खोटे वागता येत नाही, देवांनाही येत नाही, तर मग तत्संधिगत मनुष्यांना कसे येईल! ६५६

**८६ श्रोत्याचे लक्ष एकाग्र नाही असे केव्हा समजावे?**

झोप घेतानां, काडी मोडताना व जमीन उकरताना दिसल्यास ! ६५८

**८७ मद्यपी कोण ?**

नुस्ता नादिष्ट ! ६५९

**८८ मूषक कोणास म्हणावे ?**

मसलत किंवा परमेश्वराचे ध्यान यातून काही एक न करता जो एकांती बसतो त्यास !६६१

**८९ सर्प कोण ?**

कृतघ्न ! ६६२

**९० शास्त्रात विश्वासघाताला कां प्रायश्चित्त सांगितले**

**नाही ?**

प्रयश्चित्त घेतल्यावरही पुन्हा तो तसा वागणार नाही, असा विश्वास देण्याकरितां त्याच्याजवळ पुरावा नाही म्हणून ! ६६४

**९१ क्षयरोगी कोण ?**

थोडक्या कारणाकरता जो चिंतेचे डोंगर मनात वाढवितो तो ! ६६५

**९२ अधीर कोण ?**

विद्याभ्यासाचे वेळी आयुष्य अल्प आहे, असा विचार करतो तो ! ६६७

**९३ राक्षस कोण?**

एकटाच मिष्टान्न भक्षण करतो तो ! ६६८

**९४ पिशा□ा कोण ?**

पूज्यांसमोर मर्यादारहित वागतो तो !६६९

**९५ नीच कोण ?**

पोटाकरता दुसऱ्याची स्तुति करतो तो!६७०

**९६ वेडा कोण ?**





हलक्या साधनांनी उच्च मनोरथ करतो तो! ६७१

**९७ दुर्दैवी कोण ?**

ज्याचे मनोरथ नित्य भंग पावतात तो! ६७२

**९८ रडका कोण?**

साधने असता जो उगीच पश्चात्ताप करीत बसतो तो! ६७३

**९९ असहिष्णु कोण?** ६७४

चांगले बोलणे ज्याला वाईट लागते तो !

**१०० कावीळ कोणाला झाला आहे, असे समजावे?**

पूज्यांच्या चांगल्या वाक्यांचा परिणाम वाईट होईल असे पाहतो त्यास! ६७५

**१०१ क्लीब कोण ?** ६७६

समोर न बोलता मागे निंदा करतो तो !

**१०२ नित्य फसव्या कोण ? ६७७**

हांसून नुकसान करणारा व केल्यावर हांसणारा !

**१०३ प्रत्येक पदार्थाचा उपयोग करून घेणे हे योग्य आहे की नाही?**





वत्सा ! असा प्रश्न तुझ्यासारख्या आर्याला शोभत नाही, अनार्याला शोभतो. सर्व अनार्यांचे मत असेच आहे. आर्यांचे मत ह्याच्या उलट 'आपण सर्वांच्या उपयोगी पडावे' असे आहे.

शिवाय प्रत्येक पदार्थ देवाने आपल्याच उपयोगाकरता केला आहे, असे तरी देवाने आपले काय कर्ज घेतले होते? जो कोणास मारीत नाही, त्याच्यावर कुत्रेसुद्धा विश्वास टाकतात. पण सर्व आपल्याच उपयोगाकरता आहेत, अशा समजुतीच्या मनुष्यावरून प्राण्यांचा विश्वास नाहीसा होतो, त्यामुळे तेही त्याला खाण्याला टपून बसलेले असतात. पुष्कराच्या तळ्यातील ग्राह(मगर) चवताळत नाहीत आणि इतर ठिकाणचे चवताळतात या लोकांच्या म्हणण्यात काही अर्थ आहे एवढे लक्षात ठेव. ६८०

**१०४ संकट आले असता कोण फार घाबरतो?**

ज्याचा परमेश्वरावर विश्वास नाही व ज्याने आपले शरीर बळकट केले नाही तो !६८१

**१०५ ज्याला आपल्या चुका कबूल करण्याची संवय**





**आहे, व ज्याला लपवून ठेवण्याची संवय आहे, त्यापैकी कोण चांगला?**

दोघेही सारखेच. जो चुका कबूल करून अवश्य कमी करतो तो मात्र चांगला ! ६८३

**१०६ चांडाळ कोण ? ६८४**

ज्याला आपल्या मदतीवाचून लोकांचे काहीच चालणार नाही असे वाटत असून अधर्माने वागतो तो!

**१०७ कैदी कोणास म्हणावे ? ६८५**

ज्याच्या गरजा वाढल्या आहेत त्यास! ज्याच्या गरजा वाढल्या नाहीत असा मनुष्य कैदेतही सुखी राहतो.

**१०८ दुराराध्य कोणास म्हणावे ?**

जो संपत्काली इच्छून आपत्कालीसुद्धा स्वकीयापासून मान इच्छितो त्यास ! ६८६

**१०९ कातर कोण ?**

जो मनुष्य आपण होऊन दुसऱ्याचे दोष काढतो व तेच दोष दुसऱ्याने दाखविले म्हणजे दुसऱ्याची निंदा करू नये, असे प्रतिपादन करतो, तो ! ६८७

**११० आपण होऊन आपणावर संकट कोण आणून घेतो ?**

१- लोकांना ठावठिकाण सांगून गावाला जाणारा श्रीमंत. २- खाटेवाचून बाहेर निजणारा आळशी. ३- वर छत बांधल्यावाचून जेवणारा. ४- काही न येऊन आपली प्रशंसा करणारा. ५- ज्ञातीची मदत घेऊन त्यांना प्रसंगी मदत न करणारा ! हे पांच आपणावर संकट ओढवून घेतात. ६८९

**१११ सभेत किंवा समोर कोणास बसू देऊ नये?**

जो उगीच नाकातली मेकडे काढतो, किंवा थुंकतो, किंवा दाताने नखे छिलतो; या तिघास समोर किंवा सभेत बसू देऊ नये. ६९०

**११२ कोणाच्या हातून काही होत नाही हे समजावे?**

जो कारणावाचून रात्रौ जागतो व दिवसा नेहमी निजतो, त्याच्या हातून कोणतेही कार्य होणार नाही असे समजावे. ६९१

**११३ कोणाचा व्यवहार कशावरून निश्चित करावा?**

सहवासावरून ! ६९२





**११४ सर्वथा तिरस्करणीय कोण ?**

ज्याला आत्मविश्वास नाही तो! सर्व जातीतींल गालीकुमारीका त्यालाच माळ घालतात. 'आतापर्यंत ठीक झाले, पुढे काय होईल हे सांगता येत नाही' असे जो म्हणणारा आहे, तो कोणी कितीही जवळचा असला तरी कशाहीसंबंधी, कदापिही त्यावर विश्वास टाकू नये; कारण त्याच्या हातून कोणतेही घोर कृत्य होण्यास अडचण येणार नाही. नदीच्या अधोगमनाप्रमाणे घोर कृत्ये त्याच्या हातून स्वाभाविकच होत असतात. मग त्याविषयी निश्चय असो की नसो ! **'ज्याला आत्मविश्वास नाही तो जिताच आत्मघातकी होय.'**६९३

**११५ आत्मविश्वास किती ठेवावा ? ६९४**

घमेंडीने गुरु व शास्त्रांचे उल्लंघन होईल असे मात्र त्या आत्मविश्वासाने होऊ नये; मग तो कितीही ठेवावा.

**११६ घाणेरडे कोणास म्हणावे ?**

मलमूत्रविसर्जनाचे वेळी जो तोंडास काही बांधत नाही त्यास आणि मातीने स्वच्छता करीत नाही त्यास ! स्मृतींत असे म्हटले आहे की- माती व पाणी या सोप्या





रीतीने शुद्धी करण्यात जो आळस करतो, त्याचे चित्त किती शुद्ध आहे, त्याची परीक्षा झालीच आहे! - आपत्काली कोणी कोणास कशाचाच आग्रह करीत नसतो. ६९५

**११७ आंधळ्या पांगळ्यांना कसे वागवावे?**

त्यांचा प्रेम करून परामर्श घ्यावा पण विश्वास टाकू नये. कारण त्यांना एक इंद्रिय कमी असल्यामुळे दुसऱ्याला साह्य मागण्याकरता ते लबाड्या करीत असतात. ६९८

**११८ कित्येक पुरुष एखाद्या गोष्टीची प्रतिज्ञा करा म्हटल्यास भीतात व कित्येक विकाराच्या झपाट्यात प्रतिज्ञा करून टाकतात; यातील कोणाचे करणे योग्य?**

जो प्रतिज्ञा करावयाला भितो त्याला चारी पायाने मोकळे वागावेसे वाटते. प्रथम आम्ही करून पाहूं व नंतर साधले म्हणजे प्रतिज्ञा करू असे त्यांचे म्हणणे असते.

आता जे विकाराच्या तडाख्यात प्रतिज्ञा करून





टाकतात ती मोडली असता थोडा दोष आहे, पण दुसऱ्याचे नुकसान करणारी असेल तर पूर्ण करण्यात फार दोष आहे. गंभीर स्थितीत केलेली प्रतिज्ञा मात्र मोडली असतांना आर्यशास्त्रात महादोष सांगितले आहेत. ६९९

**११९ एखाद्या गोष्टीत प्रारब्धाने यश आले नाही व त्याने मनुष्याची अपकीर्ति झाली, तर त्याने कसे करावे ?**

दुसरा एखादा गुण अंगात धरून त्या गुणाने यश मिळवावे. जोडे शिवता येणे सुद्धा प्रसंगी मोठे उपयोगाचे असते.

धनुर्धरश्रेष्ठ पार्थही विराटाच्या येथे स्त्रीरूप धरून महत्वास चढला. अप्सरेने दिलेला नपुंसक होण्याचा शाप त्याला त्या वेळी उपयोगी पडला. यावरून दैवाने आणलेल्या बिकट परिस्थितीचाही बुद्धिमान् उत्तम उपयोग करून घेतात.

(साधुबोधतील काही पश्नोत्तरे)